रे.मु.क्र.२०४/२०२१

नि. २३ लगत जोड.

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.३ यांचा उर्वरीत सरतपास विधीज्ञ श्री.आर.एच. गांधी यांच्यामार्फतः</u>**

आता मला नि.६२ वरील वाटपपत्र दाखवण्यात आले. त्यावर अ.क्र.१ वर साक्षीदार म्हणुन सही आहे. ते वाटपपत्र ५ भावांमध्ये गट नं.१३४ बाबत माझ्यासमोर झाले होते. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**<u>प्रतिवादीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.आर.व्ही. शिंदे यांच्यामार्फतः</u>**

हे म्हणणे खरे आहे की माझी आजी हौसाबाई ही सोन्याबापुची बहीण आहे. त्यामुळे मला या कुटूंबाची माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की पाचही भावांना गट नं.१३४ सोडुन इतर ७/८ मिळकती आहेत. मात्र मला त्यांचे गट नंबर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की पाचही भावांमध्ये गट नं.१३४ सोडुन इतर गटांमध्ये वेगवेगळी वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की गट नं.१३४ सन १९६५ साली प्रतिवादी नं.१ याने खरेदी घेतली होती. मी सांगतो की तो गट पाचही भावांच्या वडीलांनी प्रतिवादी क्र.१ हा थोरला असल्याने त्याच्या नावावर घेतली होती. माझे वय आता ५३ पुर्ण आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मला १९६५ साली झालेल्या खरेदीखताबाबत माहीती नाही. मी सांगतो की त्या खरेदीखताबाबत माहीती मी ऐकत आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की ज्यादिवशी वाटणीपत्र झाले त्याचदिवशी गट नं.२९२ चे खरेदीखत झाले होते व त्या खरेदीखतासही मी साक्षीदार होतो. हे म्हणणे खरे नाही की वाटणीपत्र प्रतिवादी नं.१ यास फसवुन करुन घेतले होते.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

दिनांक : १३/०१/२०२६

( डॉ.एन.एस.सबनीस )

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

पारनेर